सूचना का अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२२/M/०००२८८**

**अपिलार्थी श्री. तुळशीदास मुरारी कवाळे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रबंधक**
लोकआयुक्त आणि उप लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
१ ला मजला, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई -४०० ०३२.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रबंधक**
लोकआयुक्त आणि उप लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
१ ला मजला, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई -४०० ०३२.

**<u>द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ११.०७.२०२४</u>**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. ०४.०७.२०२४ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २४.०८.२०२१ | २३.०९.२०२१ | ०४.१०.२०२१ | २२.११.२०२१ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ३१.१२.२०२१ रोजीच्या अर्जांन्वये माहिती दिली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. २३.०९.२०२१ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. २२.११.२०२१ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी दि. २४.०८.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार विलंबाने प्रदान प्रवास भत्त्यावर शासन नियमाप्रमाणे व्याज अदा करणेबाबत माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी यांनी दि.२३.०९.२०२१ रोजी अपिलार्थींना कळविले की, प्रवास भत्ता देयकाबाबतची तक्रार मुदतबाह्य असल्याने निकाली काढण्यात आली आहे. अपिलार्थींचे सदर उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि. ०४.१०.२०२१ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २२.११.२०२१ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना अभिलेखावर उपलब्ध असलेली माहिती वस्तुनिष्ठ व परिपुर्णपणे पुरविली आहे. तसेच अपिलकर्ता यांची लेखी युक्तिवादात त्यांच्या तक्रारीबाबत चौकशी/ कार्यवाहीची विनंती माहिती या संज्ञेत बसत नाही असे विशद करुन प्रथम अपील खारीज केलेले आहे.

अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे निवेदन दि. ०५.०७.२०२४ व दि. १०.०७.२०२४ आयोगास सादर केले. ते अभिलेखावर घेण्यात आले.

..२/-

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी असे सादर केले की, सदर तक्रार नस्तीवर उपलब्ध असलेली सर्व माहिती तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना दिलेली आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना माहिती दिलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : १२.०७.२०२४**

State Information Commission Greater Mumbai

प्रदीप व्यास
12-7-2024

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ